# 2 डिसेंबर

## आजचा सुविचार :

**कोणतेही कार्य हे अडथळ्याशिवाय पार पडत नाही.**
**शेवटपर्यंत जे प्रयत्न करत राहतात त्यानांच यश प्राप्त होते.**

## आजचे पंचांग :

वार – गुरुवार
तिथी - कार्तिक कृ
नक्षत्र – स्वाती
सूर्योदय – सकाळी 6.58 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 5. 58 वाजता

## आजचे दिनविशेष :

1988 : बेनझीर भुट्टो यांनी पाकिस्तानच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. कोणत्याही मुस्लिम राष्ट्राच्या पंतप्रधान बनणाऱ्या त्या पहिल्या महिला आहेत.
1989 : भारताच्या ७व्या पंतप्रधानपदी विश्वनाथ प्रताप सिंग यांचा शपतवीधी.
1999 : काळा पैसा अधिकृत व्यवहारात आणण्यास प्रतिबंध करणारे आणि परकीय चलन व्यवस्थापन करणारे (FEMA) ही दोन विधेयके लोकसभेत मंजूर

## आजचे इंग्लिश शब्द : ( Useful things / वापरातील वस्तू ) :

1) Clock – घड्याळ 2) Belt - पट्टा 3) Wrist watch – हातातील घड्याळ 4) sandal – चप्पल
5) socks – पायमोजे

## आजची प्रश्नमंजुषा :

1) तुमच्या वर्ग शिक्षकांचे नाव सांगा. 2) आपल्या भागात पिकणाऱ्या पिकांची नावे सांगा.
3) 14x 67 = किती? 4) इंदिरा गांधी कोण होत्या?
5) भारताच्या शेजारील देश कोणकोणते?

## बोधकथा :

### गर्विष्ठ मेणबत्ती

एकदा एका गृहस्थाने मेजवानीसाठी मित्रांना बोलावले होते. सगळेजण दिवाणखान्यात एका मोठ्या मेणबत्तीच्या प्रकाशात जेवत होते,ते पाहून मेनबत्तीला स्वत:चा अभिमान वाटला,आपल्या प्रकाशाचा केवढा उपयोग आहे हे पाहून ती गर्वाने म्हणाली “ज्या वेळी व ज्या ठिकाणी सूर्य चंद्राचा प्रकाश पोहोचू शकत नाही. त्या वेळी व त्या स्थळी माझा प्रकाश पडू शकतो. चंद्र सूर्य ही माझ्यापुढे क्षुद्र वाटतात.” तिचे हे गर्वाचे बोलणे ऐकून जेवणारी मंडळी हसली. त्यातला एकजण उठला व त्याने खिडकी उघडली. त्याबरोबर हवेची झुळूक आली व मेणबत्ती विझली. नंतर त्याने पुन्हा खिडकी बंद केली व मेणबत्ती पेटवली. मग तो गृहस्थ मेनबत्तीला म्हणाला “अगं वेडे तरी प्रकाश दे, एवढ्याश्या झुळकेने विझतेस, चंद्र सूर्याला क्षुद्र समजतेस त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असल्याची मिजास करतेस. चंद्र सूर्य कधी तुझ्यासारखे वाऱ्याच्या झुळुकेने विझून गेले आहेत का?”

तात्पर्य – आपल्यावर सोपवलेली कामगिरी व्यवस्थित पार पाडण्यातच मोठेपण आहे.